**उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात रक्कम थेट जमा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०२ ऑगस्ट, २०१७.

**वाचा :-** (१) महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थ सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६.
(२) शासन अधिसूचना, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक:स्कॅालर-४९१७/ प्र.क्र.१४६/मशि-२, दिनांक२९.०६.२०१७.

**प्रस्तावना :-**

गुणवान व होतकरू विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या काही शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजना उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

२. संदर्भाधिन क्र. १ येथील महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थ सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ मध्ये शासनाकडून देण्यात येणारे कोणतेही आर्थिक सहाय्य, लाभ व सेवांच्या प्रयोजनांर्थ संबंधित लाभार्थ्यांचे अधिप्रमाणन किंवा पुरावा म्हणून आधार क्रमांक प्राप्त करून त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात वित्तीय लाभाची रक्कम थेट जमा करण्याची तरतूद केली आहे. सदर अधिनियमातील कलम ३ व ४ मधील तरतुदीनुसार संदर्भाधीन क्र.२ येथील अधिसूचनेन्वये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत विद्यार्थ्यांना राज्य शासनाकडून देण्यात येणारी शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनांची सूची व सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी ओळख सिद्ध करण्याच्या प्रयोजनार्थ ओळखीचे अधिप्रमाणन किंवा पुरावा अधिसूचीत केले आहेत. त्यानुसार अधिसूचीत केलेल्या शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनांचा लाभ देण्याच्या प्रयोजनार्थ संबंधित लाभार्थ्यांचे अधिप्रमाणन किंवा पुरावा म्हणून आधार क्रमांक प्राप्त करून, त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात वित्तीय लाभाची रक्कम थेट जमा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. तरी संदर्भाधीन क्रमांक २ येथील अधिसूचनेमध्ये अधिसूचित केलेल्या शिष्यवृत्ती/ आर्थिक सहाय्य योजनेंतर्गत पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी लाभाची रक्कम ही थेट लाभार्थ्यांस त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात शासनाकडून जमा करण्यासाठी पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

संदर्भाधीन क्रमांक १ येथील महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थ सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ मधील तरतूदी व संदर्भाधीन क्रमांक २ येथील

अधिसूचना विचारात घेवून, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील **परिशिष्ट "अ"** मधील शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभाची रक्कम संबंधित महाविद्यालयांना देण्याऐवजी, पात्र लाभार्थ्यांस थेट त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यात यावी.

२. प्रस्तुत शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समन्वय अधिकारी म्हणून संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे राहतील. तसेच, सहाय्यक संचालक (लेखा), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उक्त शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेकरीता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभाची रक्कम पात्र लाभार्थ्याच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे :-

(१) **परिशिष्ट "अ"** मध्ये नमूद केलेल्या शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेच्या लाभासाठी शासनाने वेळोवेळी निश्चित केलेली कार्यपध्दती, अटी, शर्ती व निकष लागू राहतील.

(२) अर्जदार विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेसंदर्भातील ऑन-लाईन अर्जासोबत त्यांच्या आधार क्रमांकाबरोबरच आधार संलग्नित बचत बँक खात्याचा तपशिल द्यावा. संबंधित शैक्षणिक संस्था/महाविद्यालये/विद्यापीठे/सक्षम प्राधिकारी यांनी सदर योजनेसंबंधीच्या शासन निर्णयान्वये वेळोवेळी विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार प्राप्त अर्जांची छाननी करावी व DBT पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

(३) शैक्षणिक संस्था/विद्यापीठे/महाविद्यालयांनी प्रत्येक विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित करताना त्यांचा आधार क्रमांक हा संबंधित शैक्षणिक संस्था/विद्यापीठ/महविद्यालयाच्या सांकेतिक क्रमांकाशी (Unique Number) (AISHE Code अथवा शैक्षणिक संस्था/ विद्यापीठ/महाविद्यालयाने दिलेला नोंदणीकृत क्रमांक) जोडून त्याआधारे विकसित केलेली विद्यार्थ्यांची परिपूर्ण माहीती (Data Base) ही प्रस्तावित DBT पोर्टलशी जोडण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उपलब्ध करुन द्यावी.

(४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रत्येक योजनेकरिता राष्ट्रीयकृत बँकेत एक संयुक्त खाते उघडून त्याद्वारे लाभार्थी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती राज्यस्तरीय DBT पोर्टल मार्फत अदा करण्याची कार्यवाही करावी. वर नमूद खात्याव्यतिरिक्त इतर कोणतेही खाते जिल्हा/तालुका/विभागस्तरावर ठेवण्यात येऊ नये.

(५) उच्च शिक्षण संचालनालयाने शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेची माहिती महाविद्यालयाच्या सांकेतिक क्रमांकासह (Unique Number) विद्यापीठ/

महाविद्यालयाचा नोंदणीकृत क्रमांक (AISHE) DBT पोर्टलला जोडण्याची कार्यवाही करावी.

(६) सदर प्रयोजनार्थ माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून केंद्रीभूत थेट लाभ हस्तांतरण पोर्टल विकसित करण्यात येत असून, यासंदर्भात वेळोवेळी मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येईल. शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेसंदर्भातील अर्ज करण्यापासून शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्याची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियेसाठी राज्यस्तरीय DBT पोर्टलचा वापर करणे अनिवार्य राहिल.

(७) पात्र लाभार्थ्यांनी त्यांचा आधार क्रमांक हा ऑन-लाईन अर्जासोबत देणे आवश्यक असेल. तसेच ज्या बँक खात्यात पात्र लाभार्थ्यांना रक्कम प्राप्त करुन घ्यावयाची आहे, असे खाते ऑन-लाईन अर्जासोबत दिलेल्या आधार क्रमांकाशी संलग्न असल्याची खात्री करुन घ्यावी.

(८) उक्त योजनेअंतर्गत सध्या लाभ घेत असलेले व नवीन लाभार्थी विद्यार्थ्यांना यापुढे राज्यस्तरीय DBT पोर्टलवर नव्याने अर्ज करणे अनिवार्य राहिल. या योजनांतर्गत पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्याची रक्कम अदा करतेवेळी लाभार्थी विद्यार्थी, अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्था/महाविद्यालय/विद्यापीठनिहाय सविस्तर यादी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी उच्च शिक्षण संचालनालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्याची असेल. तसेच सदर यादी उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर न चुकता प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७०८०२१६१६१४४४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=440c600559857f4234e969f892346c88247ac81346a1b7229bf9917deb7bce48, cn=Rohini Bhalekar
Date: 2017.08.02 16:18:20 +05'30'

**( रोहिणी भालेकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,

४. मा.राज्यमंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई,
५. सर्व मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. प्रधान सचिव (कृषि), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) मंत्रालय, मुंबई,
१०. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे (सदर शासन निर्णय सर्व शैक्षणिक संस्था/ सर्व महाविद्यालये/ सर्व विद्यापीठे यांच्या निदर्शनास आणण्यात यावा.)
१५. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
१६. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
१८. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२२. उपसचिव (मशि/विशि/तांशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई,
२३. कक्ष अधिकारी, मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई,
२४. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक,
२५. निवड नस्ती मशि-२.

## परिशिष्ट “अ”

| अ.क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| १ | हिंदी मधील मॅट्रिकोत्तर अभ्यासासाठी अहिंदी भाषिक राज्यातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| २ | राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| ३ | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ४ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| ५ | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| ६ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य |
| ७ | राज्य शासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती |
| ८ | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| ९ | जवाहरलाल नेहरू विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| १० | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| ११ | स्वातंत्र सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |

(9)

स्वातंत्र्य सैनिकांच्या तसेच आजी व माजी
सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक, क्र. एनडीएफ १०९५/५०३/[१८०७/९५]/साशि-५.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक:- १३ जून १९९७.

वाचा:-१]शासन निर्णय,शालेय शिक्षण विभाग,क्र.एनडीएफ १०९४/
[१६६८/९४]साशि-५, दि. १३.९.१९९४.
२]शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. माजीसै १०९६/
३६३३१/२१-ई, दि. ८.११.१९९६ चे पत्र.

शासन परिपत्रक:- शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एनडीएफ १०९४/[१६६८/९४] साशि-५, दि. १३.९.१९९४ अन्वये स्वातंत्र्य सैनिकांच्या तसेच आजी व माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती मंजूर करण्यात आल्या आहेत. माजी सैनिकांच्या पाल्यांना/विधवांना शैक्षणिक सवलती देताना अर्जदाराकडून एक विहित नमुन्यात आवेदन घेतले जाते. त्याआधारे शुल्क माफी सवलत, पुस्तके व गणवेश खरेदीसाठी अनुदान दिले जाते. माजी सैनिकांना संरक्षण मंत्रालयाकडून शैक्षणिक सवलती दिल्या जातात. त्यामुळे राज्य शासन व केंद्र शासनाकडून अशा दोन्हीकडून लाभ घेऊन या योजनेचा गैरफायदा घेण्याचा प्रकार होण्याची शक्यता असल्यामुळे आजी, माजी व स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना/विधवांना शैक्षणिक सवलती देताना अर्जदाराकडून केंद्र शासनाकडून किंवा राज्य शासनाकडून यापैकी एका यंत्रणेकडून लाभ घेण्यात येत असे असे निवेदन[हमी] शिक्षणाधिकारी[माध्यमिक], जिल्हा परिषद यांनी घ्यावे व त्यानंतर शैक्षणिक सवलती मंजूर करण्यात याव्यात.

२. शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन निर्णय, क्र. एनडीएफ १०७९/२२२९२०/[५३१] साशि-५, दि. १७ जानेवारी १९८५ सोबतच्या अर्जाच्या विहित नमुन्याच्याशेवटी खालील वाक्याचा समावेश करण्यात यावा:-

"मला/माझ्या पत्नीला/मुलाला/मुलीला खाली नमूद केलेली माहिती विचारात घेऊन १९..ते १९.. या शैक्षणिक वर्षासाठी शैक्षणिक सवलती मंजूर करण्यात. शैक्षणिक सवलती मला महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाकडून घेत आहे. केंद्र शासनाकडून शैक्षणिक सवलतीबाबत कोणताही आर्थिक किंवा वस्तु स्वरूपात लाभ स्वीकारण्यात येत नाही असे प्रतिज्ञेवर लेखी देत आहे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

[ स. शी. नारकर ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
राज्य शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे

स्वातंत्र्य सैनिकांच्या तसेच आजी-माजी
सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय, क्र. एनडीएफ/२००४/(६१३/०४)/केपुप्रो
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२.
दिनांक : २५ ऑक्टोबर, २००४.

**संदर्भ :** १) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र. एमआयएस १४६५/एच, दि.२३.११.१९६५
२) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र.एनडीएफ १०७२/२४८७/एस, दि. १०.११.१९७२
३) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र. एनडीएफ-१०७९/२२२९२० / (५३७)/साशि-५, दि. १४ जानेवारी १९८५
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एनडीएफ १०९४/(१६६८/९४)/साशि-५, दि. १३ सप्टेंबर १९९४.

शासन निर्णय :-

स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती देण्याची योजना शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एमआयएस १४६५/एच, दि.२३.११.१९६५ अन्वये, आजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती देण्याची योजना शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र.एनडीएफ १०७२/२४८७/एस, दि.१०.११.१९७२ अन्वये व माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती देण्याची योजना शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र. एनडीएफ-१०७९/२२२९२० /(५३७)/साशि ५, दि. १४ जानेवारी, १९८५ अन्वये कार्यान्वित आहे. सदर योजनेनुसार वर नमूद केलेल्या स्वातंत्र्य/आजी/माजी सैनिकांच्या मुलांना/मुलींना/पत्नींना/विधवांना राज्यातील मान्यताप्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थांत शिक्षणाच्या सर्व स्तरावर (इ. १ली ते पदव्युत्तर स्तरापर्यंत) मोफत शैक्षणिक सवलत देण्यात आली आहे. सवलतीच्या दरांमध्ये शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एनडीएफ १०९४/(१६६८/९४)/साशि-५, दि. १३ सप्टेंबर १९९४ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. तत्कालिन शिक्षण व सेवायोजन विभागाचे मे १९९२ मध्ये " शालेय शिक्षण विभाग" व " उच्च व तंत्र शिक्षण विभाग" अशा दोन विभागांमध्ये विभाजन झाले आहे. त्यामुळे यापुढे उपरोक्त योजनेअंतर्गत या विभागाच्या अधिपत्याखालील इ. १ ली ते १२ वीच्या संबंधित विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षापासून (सन २००५-०६) लाभ अनुज्ञेय राहील. इ. १२ वी नंतर

उच्च व तंत्र शिक्षण घेणाऱ्या लाभार्थी विद्यार्थ्यांबाबत पुढील शैक्षणिक वर्षापासून (सन २००४-०५) उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्र. प्र. वळवी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
सचिव, महाराष्ट्र राज्य (सैनिक बोर्ड, कौन्सिल हॉल, पुणे)(व्यापक प्रसिध्दी देण्यास)
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
तंत्र प्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, पुरातत्व व पुराभिलेख, महाराष्ट्र राज्य, मुंबई
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
समाजकल्याण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
संचालक, वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
शेतीसंचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
**महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १-२, मुंबई/ नागपूर**
**महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १-२, मुंबई/ नागपूर**
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई.
सर्व जिल्हयांचे कोषागार अधिकारी
पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई(योग्य ती प्रसिध्दी देण्याकरिता)
सर्व जिल्हयांच्या जिल्हा सैनिक मंडळाचे अध्यक्ष
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उपसंचालक
पोलीस आयुक्त, मुंबई.
सर्व जिल्हयांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद
शिक्षण निरीक्षक, मुंबई (दक्षिण, उत्तर आणि पश्चिम),
भारत सरकारचे सचिव, शिक्षण व समाजकल्याण मंत्रालय, नवी दिल्ली.
भारत सरकारचे सचिव,संरक्षण मंत्रालय, नवी दिल्ली.
मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (शा.शि.) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (शा.शि.) यांचे खाजगी सचिव
शालेय शिक्षण विभागांतर्गत सर्व कार्यासने.
निवड नस्ती, केपुयो

A:kpuyo-led 2004-510-24oa11

(१०)

स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती-
गोवा-मुक्ती संग्रामात भाग घेतलेल्या
महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना
लागू करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक-एफएफई-१०८८/[५४३/८८]/साशि -५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक :- ३१ डिसेंबर, १९९०

संदर्भ :- १] शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग
क्रमांक-एमआयएस-१४६५/एच, दिनांक २३ नोव्हेंबर १९६५.

२] शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-एफएफई-१०८१/
[सीआर-१०८०]/साशि-५, दिनांक ३० सप्टेंबर १९८२.

३] शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक-पीओएस-१२.७/[३]/स्वातंत्र्य, दि. २२. १. १९८६.

४] शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची पत्रे
क्रमांक-गोमु/सैसं/१०८७/२१-ई, दिनांक १३. ७. १९८७ व
दिनांक ७. ९. १९९०.

**शासन निर्णय :-** स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती लागू करण्याची योजना शासन निर्णय, शिक्षण व समाज कल्याण विभाग, क्रमांक-एमआयएस-१४६५/एच दिनांक २३ नोव्हेंबर १९६५ अन्वये कार्यान्वित करण्यांत आली आहे. तसेच शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-एफएफई-१०८१/[सीआर-१०८०]साशि-५ दिनांक ३० सप्टेंबर १९८२ अन्वये त्यामध्ये या सवलतीसाठी विहित केलेली स्वातंत्र्य सैनिकांची उत्पन्न मर्यादा काढून टाकण्यांत आलेली आहे. अशा त-हेने सध्या कार्यान्वित असलेली योजना गोवा-मुक्ती संग्रामात भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना लागू करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. गोवा-मुक्ती संग्रामात भाग घेतलेल्या ज्या स्वातंत्र्य सैनिकांना शिक्षा झाली व तुरुंगवास भोगावा लागला किंवा ज्यांना जखमा झाल्या आणि हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल व्हावे लागले अशा स्वातंत्र्य सैनिकांना आवश्यकतो कागदोपत्री पुरावा सादर केल्यास शासनाने शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. पीओएस-१९७५/[३] स्वसै कक्ष

..२..

दिनांक २२.१.१९८६ अन्वये "स्वातंत्र्य सैनिक" म्हणून समजण्यात आले आहे. तेव्हा अशा गोवा-मुक्ती संग्रामातील महाराष्ट्रात स्थायीक झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना, "स्वातंत्र्य सैनिकांच्या" पाल्यांना अनुज्ञेय असलेल्या सर्व शैक्षणिक सवलती" १९९०-९१ च्या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात याव्यात असे शासनाने ठरविले आहे. तेव्हा शासन निर्णय, शिक्षण व समाज कल्याण विभाग क्रमांक-एसआयएस-१४६५/एच, दिनांक २३.११.१९६५ अन्वये मंजूर केलेल्या सर्व शैक्षणिक सवलती गोवा-मुक्ती संग्रामात भाग घेतलेल्यांपैकी ज्यांना स्वातंत्र्य सैनिक म्हणून समजण्यात आले अशांच्या पाल्यांना १९९०-९१ च्या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे. १९९०-९१ यावर्षी मात्र या सवलतीसाठी अर्ज करण्याची मुदत खास बाब म्हणून दिनांक ५/२/९१ पर्यंत वाढवून देण्यात येत आहे.

२. या प्रित्यर्थ होणारा खर्च "२२०२-सर्वसाधारण शिक्षण-८०, सर्वसाधारण-८००, इतर खर्च-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना[पाच](बी) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती मागणी क्रमांक-ई-३" या शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो "२२०२-सर्वसाधारण शिक्षण" या शीर्षाखाली चालू आर्थिक वर्षी मंजूर केलेल्या तरतूदीतून पुर्नविनियोजनाने भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-प्रकरण क्र.१५-९४ व्यय-५, दिनांक ७.११.१९९० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ अ. श्री. नाईक ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति -

१] शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२] शिक्षण संचालक, [उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे.
३] संचालक [तंत्र शिक्षण], महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४] संचालक [व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण], महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५] कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

स्वातंत्र्य सैनिकांच्या तसेच आजी व माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती, या सवलतीमधील पुस्तक अनुदान, गणवेश अनुदान, शिष्यवृत्ती, विद्यावेतन यांत वाढ करणे.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय, क्र. एनडीएफ-१०९४/(१६६८/९४) साशि - ५, मंत्रालय,
विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक १३ सप्टेंबर ९४

संदर्भ - १) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग
क्र. एमआयएस-१४६५/एच, दिनांक २३. ११. ६५
२) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग,
क्र. एनडीएफ-१०७२/२४८७/एस, दिनांक २०. ११. ७२
३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग
क्र. एनडीएफ-१०७९/२२२९२०/(५३७) साशि-५,
दिनांक १४. १. ८५

प्रस्तावना - स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती देण्याची योजना शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एमआयएस १४६५/एच, दि. २३. ११. १९६५ अन्वये, आजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती देण्याची योजना शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एनडीएफ/१०७२/२४८७/एस, दि. २०. ११. ७२ अन्वये व माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती देण्याची योजना शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एनडीएफ १०७९/२२२९२०/(५३७) साशि-५, दिनांक १४. १. ८५ अन्वये कार्यान्वित होत आहे. सदर योजनेनुसार स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना तसेच आजी व माजी सैनिकांच्या पाल्यांना देण्यात येणाऱ्या सवलती मधील पुस्तक अनुदान, गणवेश अनुदान, शिष्यवृत्ती व विद्यावेतन यामध्ये सुधारणा व्हावी म्हणून शासनाकडे स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार व महाराष्ट्र राज्य सैनिक मंडळ यांच्याकडून सतत पाठपुरावा करण्यात येत होता.

शासन निर्णय - स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती व महाराष्ट्र राज्य, सैनिक मंडळ यांनी केलेल्या मागणीचा शासनाने सहानुभूतीने सर्वकष विचार केला. आणि स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना तसेच आजी व माजी सैनिकांच्या पाल्यांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलती या योजनेतील पुस्तक अनुदान, गणवेश अनुदान शिष्यवृत्ती व विद्यावेतन यात दरात दिनांक १. ४. १९९४ पासून वाढ करण्यास व त्यासाठी १९९४-९५ या आर्थिक वर्षामध्ये रुपये ४०, ३१, ०००/- च्या

..२..

प्राढीप अर्थात संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १, २ व ३ मधील अटींच्या अधीन राहून मंजुरी देण्यात येत आहे. सुधारित दरासंबंधीचे विवरणपत्र सोबत जोडले आहे.

२. या योजनेप्रित्यर्थ होणारा खर्च "२२०२-सर्वसाधारण शिक्षण - ८० - सर्वसाधारण - ८०० इतर खर्च (पाच) (१) (एक) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती (२२०२ १३९४) व (आठ) (१) (एक) सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती (२२०२ १५०९) या शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्यासाठी चालू वर्षी करण्यात आलेल्या तरतुदीतून तो भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३५२/९४/व्यय-५अ, दिनांक ११.५.१९९४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
(प्र. ङ्ग. नाईक)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व मंत्रालयीन विभाग,

क्रमांक: अशासे/१०९४/३१ ड्ड
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे ४११ ००१, दिनांक २३.४.९४.

माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(सही) ०९/५६ २८.०५.१९९४
शिक्षण संचालकांकरिता

प्रति,
१) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद
२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
३) शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई (दक्षिण/उत्तर/पश्चिम)

प्रमु २१.९.१९९४

स्वातंत्र्य सैनिक, आजी व माजी सैनिक यांच्या पाल्यांना देण्यात येणा-या शैक्षणिक सवलतीमधील पुस्तक अनुदान, गणवेश, अनुदान, शिष्यवृत्ती व विद्यावेतन यांच्या दराबाबतचे विवरणपत्र

| तपशील | १ली ते ४थी | ५वी ते ७वी | ८वी ते १०वी | ११वी/१२वी | प्रमाणपत्र | पदविका | पदवी व पदव्युत्तर | पदवी व पदव्युत्तर (अभियांत्रिकी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती | | | | | | | | |
| अ) शिष्यवृत्ती – | | | | | | | | |
| प्रचलित दर (दरमहा) | — | [१०] | [१०] | [१०] | [४०] | [५०] | [५०] | [६०] |
| सुधारित दर (दरमहा) | — | १५ | २० | २५ | ६० | ५० | ५० | ६० |
| ब) पुस्तक अनुदान | | | | | | | | |
| प्रचलित दर (वार्षिक) | [१५] | [२०] | [४०] | [४०] | [५०] | [१००] | [१००] | [२००] |
| सुधारित दर (वार्षिक) | २५ | ५० | ७५ | ७५ | ७५ | २०० | २०० | ४०० |
| आजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती | | | | | | | | |
| अ) पुस्तक अनुदान व लेखन सामग्री "अ" वर्ग | | | | | | | | |
| प्रचलित दर (वार्षिक) | [२०] | [२०] | [६०] | [६०] | [५०] | [१००] | [१००] | [२००] |
| सुधारित दर (वार्षिक) | ३० | ५० | १०० | १०० | १०० | २०० | २०० | ४०० |
| "ब" व "क" वर्ग | | | | | | | | |
| प्रचलित दर (वार्षिक) | [१०] | [१०] | [३०] | [३०] | — | — | — | — |
| सुधारित दर (वार्षिक) | २५ | ५० | ७५ | ७५ | — | — | — | — |

(६)

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | "ड" वर्ग | | | | | | | | |
| | प्रचलित दर [वार्षिक] | – | – | – | – | – | [१००] | [१००] | [१००] |
| | सुधारित दर [वार्षिक] | | | | | | २०० | २०० | २०० |
| | गणवेश व कपडे अनुदान | | | | | | | | |
| | "ब" वर्ग | | | | | | | | |
| | प्रचलित दर [वार्षिक] | [५०] | [५०] | [१००] | [१००] | [१००] | [१५०] | [१५०] | [२००] |
| | सुधारित दर [वार्षिक] | ६० | ८० | १०० | १०० | १०० | १५० | १५० | २०० |
| | "ह" व "क" वर्ग | | | | | | | | |
| | प्रचलित दर [वार्षिक] | [२५] | [२५] | [५०] | [५०] | – | – | – | – |
| | सुधारित दर [वार्षिक] | ६० | ८० | १०० | १०० | – | – | – | – |
| | पत्नी व विधवांना निर्वाहन | | | | | | | | |
| | प्रचलित दर [दरमहा] | | | [२५] | [३५] | | | | |
| | सुधारित दर [दरमहा] | | | ४० | ५० | | | | |
| ६) | माजी सैनिक त्यांच्या पत्नींना विशेष सवलती | | | | | | | | |
| | प्रत्यक्ष अनुदान | | | | | | | | |
| | प्रचलित दर [वार्षिक] | [१०] | [१०] | [३०] | [३०] | | | | |
| | सुधारित दर [वार्षिक] | २५ | ५० | ७५ | ७५ | | | | |
| | गणवेश व कपडे अनुदान | | | | | | | | |
| | प्रचलित दर [वार्षिक] | [२५] | [२५] | [५०] | [५०] | | | | |
| | सुधारित दर [वार्षिक] | ६० | ६० | ८० | १०० | | | | |
| | पत्नी/विधवांना निर्वाहन | | | | | | | | |
| | प्रचलित दर [दरमहा] | | | | | [२५] | [३५] | | |
| | सुधारित दर [दरमहा] | | | | | ४० | ५० | | |

Grant of Educational Concessions to the children of Freedom Fighters- Revised Scheme regarding-

GOVERNMENT OF MAHARASHTRA.
Education and Social Welfare Department,
Resolution No. MIS 1465-H.
Sachivalaya Annexe, Bombay-32, 23rd November 1965.

READ:- Government Resolution, Education and Social Welfare Department No.MIS 1461-H, dated 15th March 1962.
Government Corrigendum No. MIS 1461-H, dated 26th July 1962.
Government Resolution, Education and Social Welfare Department.
No.MIS-1462-H, dated 22nd October 1962
No. MIS 1462/70844-H, dated 19th July 1963
No.MIS 1463-H, dated 7th September 1963
No. MIS 1463-102807-H, dated 18th November 1963.
Government Letter, Education and Social Welfare Department No.MIS 1463/77641-H, dated 19th November 1963
Government Resolution, Education and Social Welfare Department No. MIS 1463-H, dated 29th June 1964.

RESOLUTION:- The question of liberalisation of the scheme regarding grant of Scholarship and other educational facilities to the children of Political Sufferers ( now termed as "Freedom Fighters") sanctioned under Government Resolution, Education and Social Welfare Department No.MIS 1461-H, dated the 15th March 1962 and amended from time to time was under the consideration of the Government for some time. After careful consideration, Government is now pleased to direct that the term "Political Sufferer" should be replaced by "Freedom Fighter". Government is also pleased to sanction with effect from 1st September 1965, the revised scheme for the grant of Scholarships and other educational facilities to the Freedom Fighter, his wife, children (including adopted and step children) and grand children of the predecessed sons of Freedom Fighters as detailed in the *accompanying appendix"A".

2. Orders pointing out the source from which the expenditure could be met will be issued hereafter.

This Resolution issues with the concurrence of the Finance Department vide its unofficial reference No. 16144/II, dated 14th September 1965.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R.S.RAMBHAD,
Under Secretary to Government.

To

All Departments of the Sachivalaya,
The Director of Education, Maharashtra State, Poona,
The Director of Technical Education, Maharashtra, Bombay
The Director of Social Welfare, Maharashtra State, Poona
The Director of Art, Maharashtra State, Bombay
All the Regional Deputy Directors of Education,
All the Regional Deputy Directors of Technical Education
All the Divisional Social Welfare Officer,
The Educational Inspector, Greater Bombay,
All the Chief Executive Officers Z-illa Parishads,

*Printed as an accompaniment to this Resolution.

... give wide publicity to the Scheme, ... State, Bombay with
The Other Heads of Offices under the Education and Social Welfare Department,
The Accountant General, Maharashtra, Bombay,
The Senior Deputy Accountant General, Nagpur,
The Pay and Accounts Officer, Bombay,
The Resident Audit Officer, Bombay,
The Director of Agriculture, Maharashtra State, Poona,
The Surgeon General with the Government of Maharashtra, Bombay
The Director of Ayurved, Maharashtra State, Opposite Sachivalaya, Bombay,
The Principal, Dairy Technology Institute, Aarey, Bombay-65,
The Director of Animal Husbandry and Veterinary Services, Maharashtra State, Poona,
The Examiner of Books and Publications, Maharashtra State, Bombay (with a request kindly to furnish to Government the Presscuttings on the subject.)

No. of 1965.

Copy forwarded for information and guidance to -

---

ACCOMPANIMENT TO GOVERNMENT RESOLUTION, EDUCATIONAL AND SOCIAL WELFARE DEPARTMENT, NO. MIS 1465-H, DATED THE 23rd NOVEMBER 1965.

## APPENDIX - "A".

Scheme for the grant of Scholarships and other Educational facilities to the Freedon Fighter, his wife, children (inclusive of adopted and step-children) and grand children of predeceased son) of Freedom Fighters.

---

1. This scheme shall apply to a Freedom Fighter, his wife. children (inclusive of adopted and step-children) and grand children ( chidren of pre-deceased sons) provided the income of the Freedon Fighter does not exceed Rs. 300/- p.m.

2. For the purposes of the shceme the income shall mean the sum total of the income from all sources including share in the joint family income and the independent individual income of the pupil himself and of his parents, and in the absence of his parents of the person or persons responsible for the maintenance and education of the pupil during the financial year preceding the year in which the grant of scholarship and other educatioanl concessions under the scheme are sought for.

3. Freedom Fighters should produce a certificate about his income signed by a Gazetted Officer of any Department, Hon. Magistrate or Justice of Peace.

4. "Freedom Fighter" for the purpose of these concessions, means a person who has suffered imprisonment or detention of not less than one person who has suffered imprisonment or

detention of not less than one month or who was fined Rs. 100/- or more, or who died or was killed in action or in detention or was awarded capital punishment, or become permanently incapacitated due to firing or lathi charge, or lost his job or means of livelihood, or part or whole of his property on account of his participation in National Movement for the emancipation of India. (2) The period of one month shall include small spells of imprisonment/detention suffered as a result of participation in the National Movement of India if the total period of such imprisonment/detention is not less than one month. Those who participated in the *I.N.A. movement shall for the purpose of the Scheme, be treated on par with Freedom Fighters as defined above. The persons who participated in the movement for responsible Government carried out in the Ex-Hyderabad State shall also be treated as Freedom Fighters for the purposes of benefits under this scheme provided they satisfy the conditions regarding quantum of imprisonment/detention/fine etc. as per definition of a Freedom Fighter defined above and also other conditions of the scheme.

5. Production of a certificate from any Magistrate in the District from which the Freedom Fighter concerned was sentenced to jail or suffered in any other manner as mentioned above would be a sufficient proof in this respect When the records of the jail are not available and as a result of which it is not possible for a Freedom Fighter to produce a certificate from a Magistrate, he will have to file a affidavit in support of the imprisonment or detention, et suffered by him. The term "Magistrate" shall include all executive Magistrates and Hon. Magistrates also. Accordingly, all Officers such as Mamlatdars, Mahalkaris, Tahsildar, Police Officers in Greater Bombay, etc. who have been declared as Executive Magistrates and special executive Magistrates under Government Resolution, Home Department, No. SRO 1057/5329-III, dated the 1st September, 1959 and No. 3558/7, dated the 1st July 1953, and Government Notification, Home Department, No. 3291/7-D, dated the 21st February 1955, can issue a certificate regarding imprisonment, detention, etc. to the Freedom Fighter, if they are satisfied about the veracity of the statements of such Freedom Fighter.

6. The affidavit mentioned in (5) above should also be to the effect that Freedom Fighter fulfills the conditions of eligibility about income. In addition, he will have to enter into an agreement to the effect that in case it is found that the concession was obtained on the basis of an incorrect or false affidavit, the entire amount of the concession together with interest thereon at the market rate will be recoverable from him as arrears of land revenue.

7. The Freedom Fighter shall be allowed to produce such certificates/affidavits in original in respect of an application for one child and shall be allowed to attach copies of such document to applications for the other children. But such copies should be duly attested by any Gazetted Officer or Hon. Magistrate or Member of Legislative Assembly or M.L.C. The Freedom Fighter shall produce such certificates/affidavits along with his first application only. He need not produce it along with his

* INDIAN NATIONAL ARMY.

... for the subsequent year or years. In case of doubt, the Director of Education, Maharashtra State, Poona, shall verify the facts from the documents produced by Freedom Fighter with his first original application. In the case of a deceased Freedom Fighter, whose children could have otherwise been held eligible for the concessions in question, had the freedom fighter been alive, the affidavit and agreement required to be executed by the Freedom Fighter concerned in the ordinary cases, shall be allowed to be executed by any such relative or any male person interested in the children of the deceased Freedom Fighter, so as to enable such children to avail of the concessions.

8. Admission shall be given to the beneficiaries under the scheme in recognised schools irrespective of minimum number of marks required for admission.

9. Credit of 10 marks in the grand total should be given to the beneficiaries under the scheme while deciding the admission on merits to Medical and Engineering Courses.

10. Free-studentship shall be awarded to the beneficiaries under this scheme, irrespective of age:-

i) In Standards, V, VI and VII of recognised and aided Secondary Schools in cases when the pupils have failed to obtain admission in existing primary schools having such standards and wherein provision for teaching of English is made or where public primary schools have no such standards;

ii) In Standards V, VI and VII of recognised and aided Technical Schools provided that there are no public Primary or Secondary Schools teaching technical subjects in such standards.

iii) In higher classes viz. Standards VIII to XI of Government and aided private recognised schools, including technical high schools and Hight Secondary Schools. The loss of income of fee on this account to non-Government Schools shall be reimbursed to them.

11. Freestudentship shall also be awarded to the beneficiaries undergoing teacher-training in Government and recognised basic training colleges and all other post S.S.C. Degree, Diploma and Certificate Courses recognised by the competent authorities, and to which the scheme of Economically Backward Class concessions is applicable. The loss of fee income on this account to non-Government institutions shallbbe reimbursed to them.

12. In addition to the freestudentships mentioned in paras 10 and 11 above, Scholarship and Book-grants shall be awarded to the beneficiaries upto Post-Graduate level at the rates mentioned below in paras 13 and 14.

13. SCHOLARSHIPS:

a) Standard V to XI .. Rs.10/- p.m.

Contd..